**महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण–१९९६**

महाराष्ट्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अतुलनीय कामगिरी केलेल्या वयोवृद्ध महिला/पुरुष खेळाडूंना मासिक मानधन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-१०९७/प्र.क्र. ४०३/क्रीयुसे-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ५ फेब्रुवारी १९९८

वाचा :–(१) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्र.पीएचई-१०८४/५२९/४०/एसवायएस, दिनांक २९ जून १९८४.

(२) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्र. सेनिवे-१०९१ / प्र. क्र. ८२/ क्रीयुसे-१, दिनांक १० जून १९९३.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्र राज्यातील ज्या खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अतुलनीय कामगिरी केली आहे अशा खेळाडूंना वृद्धापकाळात मासिक मानधन देण्याची योजना कार्यान्वित आहे. तथापि सध्या उपलब्ध असलेला मानधनाचा दर किमान गरजा तसेच दैनंदिन गरजेच्या वस्तूंची भाववाढ लक्षात घेता अत्यंत अल्प आहे. त्यात वाढ करण्याची मागणी सातत्याने क्रीडा क्षेत्रातील विविध स्तरातून होत होती. नामवंत खेळाडूंना त्यांच्या वृद्धापकाळात मानाने जीवन जगता यावे या उद्देशाने मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. आता राज्याच्या क्रीडा धोरणात याबाबतचा निर्णय घेतला असून त्यानुसार सोबत जोडलेल्या परिशिष्टाप्रमाणे सुधारित नियमास व मानधनाच्या सुधारित दरास शासन मान्यता देत आहे.

हे आदेश शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील.

या योजनेअंतर्गत वयोवृद्ध योग्य खेळाडूंची निवड करण्याकरिता शासनाने नियुक्त केलेल्या समितीने पात्र खेळाडूंना मान्यता दिल्यानंतर मानधन मंजूरीबाबतची पुढील कार्यवाही करण्यास संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अधिकार प्रदान करण्यात येत असून यासाठी संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यांत येत आहे.

यावर होणारा खर्च त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यांत यावा आणि तो " २२०४–क्रीडा व युवक सेवा–१०४–क्रीडा व खेळ–(आठ)(ए)(दोन) नावाजलेल्या खेळाडूंना त्यांच्या वृद्धापकाळात वित्तीय सहाय्य–संगणक क्रमांक–(२२०४ ११० १), योजनेतर " या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यांत यावा.

हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक प्र. क्र. १०७५/व्यय-११, दिनांक ८ डिसेंबर १९९७ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रमेशचंद्र कानडे),
सचिव,
महाराष्ट्र शासन.

## परिशिष्ट

शासन निर्णय क्र. राक्रीधो-१०९६/प्र.क्र. ४०३/क्रीयुसे-१, दिनाक ५ फेब्रुवारी १९९८ चे सहपत्र

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अतुलनीय कामगिरी केलेल्या वयोवृद्ध खेळाडूंना मानधन देण्याची नियमावली.

**नियम : १–शिर्षक.**––या नियमास '' महाराष्ट्रातील वयोवृद्ध महिला/पुरुष खेळाडूंना मानधन देण्याचे नियम '' असे संबोधण्यात यावे.

**नियम : २–अंमलबजावणीचा दिनांक.**–सदर नियम शासन निर्णयाच्या दिनांकपासून पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील.

**नियम : ३–पात्रतेसाठी अटी व शर्ती :**––

(अ) या योजनेअन्वये मानधन देताना महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेने मान्यता दिलेल्या खेळांचाच विचार करण्यात यावा.

(ब) कुमार, किशोर, युवक व वयस्क गटाच्या स्पर्धातील कामगिरी विचारात घेऊ नये.

(क) अर्जदार महिला/पुरुष खेळाडूंचे वय अर्ज करण्याच्या तारखेस ५० वर्षापेक्षा जास्त असावे. तथापि हिंद केसरी, रुस्तमे हिंद, महान भारत, भारत केसरी किताब मिळविणाऱ्या कुस्तीगिरांना वयाची अट लागू होणार नाही.

(ड) मानधन मंजूर झालेला पुरुष खेळाडू दिवंगत झाल्यास त्यास मिळणारे मानधन त्याच्या पत्नीला त्यांच्या हयातीपर्यंत देण्यात येईल.

(इ) जे खेळाडू दुर्धर व्याधीने (उदा. अर्धांगवायू, क्षय, कर्करोग, कुष्ठरोग इ.) आजारी असतील व जे खेळाडू शारीरिक व्यंग असल्यामुळे स्वतःचा उदर निर्वाह करु शकत नसतील अशा खेळाडूंच्या बाबतीत नियम-३ (क) मध्ये नमूद केलेली वयाची अट शिथिल करण्यात येईल. तथापि त्यांनी अपंगत्व अथवा दुर्धर व्याधीसंबंधीचे शासकीय रुग्णालयाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(ई) ज्या खेळाडूचे सर्व मार्गांनी मिळून वार्षिक रु. ४०,०००/- (रुपये चाळीस हजार फक्त) पेक्षा कमी आहे अशाच खेळाडूंना या योजनेचा लाभ घेता येईल. खेळाडूने उत्पन्नाचे प्रमाणपत्र संबंधित तहसिलदारांकडून प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. वार्षिक उत्पन्न मानधन मिळण्यास सुरुवात झाल्यानंतर ज्यावर्षी रु ४०,००० पेक्षा जास्त होईल (मिळालेल्या मानधनाची रक्कम विचारात न घेता) त्या वर्षापासून खेळाडूना देण्यात येणारे मानधन थांबविण्यात येईल. तथापि हिंद केसरी, रुस्तमे हिंद, महान भारत, भारत केसरी किताब मिळविणाऱ्या कुस्तीगिरांना उत्पन्नाची अट लागू होणार नाही.

(फ) (१) आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानधनासाठी अर्जदार ऑलिंपिक, आशियाई किंवा कॉमनवेल्थ यापैकी किमान एका स्पर्धेत सहभागी झालेला असावा.

(२) अर्जदार खेळाडूने एकविध खेळांच्या राष्ट्रीय संघटनेने आयोजित केलेल्या खुल्या गटातील राष्ट्रीय अजिक्यपद स्पर्धेत एकविध खेळाच्या राज्य संघटनेमार्फत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व किमान ५ वेळा केले असणे आवश्यक आहे किंवा ३ वर्षे असे प्रतिनिधीत्व करून या ३ वर्षात किमान एकदा पहिला, दुसरा अगर तिसरा क्रमांक मिळविणे आवश्यक आहे.

(३) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते (अपंग खेळाडू) जर वयाची व उत्पन्नाची अट पूर्ण करीत असतील तर मानधनासाठी पात्र ठरतील.

**नियम : ४–मानधनाचे दर.**––स्तरनिहाय मासिक मानधनाचे दर खालीलप्रमाणे राहतील :––

| क्रीडापटूने ज्या स्तरावर कामगिरी केली तो स्तर | मानधनाचे दर (मासिक) |
|---|---|
| (१) आंतरराष्ट्रीय स्तर .. .. | रु. १,०००/- (रु. एक हजार फक्त) |
| (२) राष्ट्रीय स्तर .. .. | रु. ८००/- (रु. आठशे फक्त) |
| (३) कुस्ती-हिंद केसरी, रुस्तमे हिंद, महान भारत, भारत केसरी | रु. १,०००/- (रु. एक हजार फक्त) |

**नियम : ५–अर्ज करण्याची पद्धत.**––मानधन मिळविण्यासाठी संबंधित खेळाडूने विनंती अर्ज विहित प्रपत्रामध्ये संचालक, क्रीडा व युवक सेवा. महाराष्ट्र राज्य, सेंट्रल बिल्डींग, पुणे ४११ ००१, यांच्याकडे संबंधित जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यामार्फत आवश्यक त्या माहितीसह विहित केलेल्या तारखेच्या आत करणे आवश्यक आहे.

अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांची/कागदपत्रांची पूर्तता करण्यात यावी.

(अ) खेळाडू वा त्याची विधवा पत्नी यांचा अर्ज करण्याच्या वेळी काढलेल्या व राजपत्रित अधिकाऱ्याने साक्षांकित केलेल्या पासपोर्ट आकाराच्या फोटोच्या तीन प्रती.

(ब) खेळाडूंच्या जन्मतारखेसंबंधी दाखला किंवा जन्मतारीख दर्शविणारे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र.

(क) स्पर्धतील कामगिरीबाबतच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत तसेच खेळाडूने केलेली कामगिरी ही त्या खेळातील राज्य संघटनेने प्रमाणित केलेली असावी. राज्य संघटनेने कामगिरी प्रमाणित केलेली नसल्यास सदर महिला/पुरुष खेळाडू अपात्र ठरविण्यात येईल.

(ड) अर्ज करण्याच्या तारखेस खेळाडू महाराष्ट्राचा १५ वर्षे रहिवासी असल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

**नियम : ६–अर्जाची छाननी.**––खेळाडू अथवा त्याची विधवा पत्नी यांनी मानधन मंजूर होण्यासाठी विहित नमुन्यात केलेला अर्ज संबंधित जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांमार्फत विहित केलेल्या तारखेपर्यंत संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मागवावा. अर्जातील माहितीची व खेळाडूच्या क्रीडा विषयक कामगिरीची नियमानुसार छाननी करावी. अंतिम मान्यतेसाठी शासनाने नियुक्त केलेल्या समितीपुढे सर्व अर्ज संचालक, (क्रीडा) यांनी अभिप्रायासह सादर करावेत.

**नियम : ७–मंजूरीचे अधिकार.**––निवड समितीने पात्र ठरविलेल्या खेळाडूंना मानधन मंजूर करण्याचे अधिकार संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील.

**नियम : ८–आहरण व संवितरण अधिकारी.**––मंजूर मानधनाची रक्कम संबंधित खेळाडूच्या बँकेतील खात्यात दरमहा १० तारखेच्या आत धनादेशाद्वारे जमा करण्यासाठी संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

**नियम : ९–निवड समिती.**––खेळाडूंना मानधन मंजूरीची शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरीय समिती गठीत करावी.

| | |
|---|---|
| (१) सचिव (क्रीडा) | अध्यक्ष |
| (२) महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेचे शासनाने नाम निर्दिष्ट केलेले तीन सदस्य | अशासकीय सदस्य |
| (३) संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| (४) उपसंचालक (क्रीडा), मुख्यालय | सदस्य सचिव. |

**नियम : १०–नियमात बदल शिथील करण्याचे अधिकार.**––सदर नियमात अंशतः / पूर्णतः बदल अथवा शिथील करण्याचे अधिकार नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने प्रशासकीय विभागास राहतील.